संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# हुतात्म्यांच्या बलिदानाचा राजकीय वापर नको

यावेळच्या अंदाजपत्रकामध्ये संरक्षण विभागासाठी सर्वाधिक म्हणजे तीन लाख कोटींची तरतूद केली गेली. देशाची सुरक्षितता किंवा संरक्षणासाठी अशा मोठ्या निधीची आवश्यकता आहेच. परंतु आज सर्वात महत्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे गेल्या चार वर्षात वेगवेगळ्या दहशतवादी हल्ल्यांमध्ये सर्वाधिक जवान हुतात्मे झाले आहेत. संरक्षणासाठी पैशांची तरतूद करणे किंवा हुतात्म्यांच्या कुटुंबियांना दिली जाणारी मदत दुप्पट करणे या गोष्टी त्यांच्या बलिदानालाच सन्मान करणाऱ्या आहेतच. परंतु केवळ पैशाच्या जोरावर हुतात्म्यांच्या बलिदानाची किंमत करण्याची राजकारण्यांची किंवा सत्ताधाऱ्यांची प्रवृत्ती अत्यंत चुकीची ठरते. खरे तर केंद्राने धोरणात्मक पातळीवर आपल्या जवानांच्या जीविताचे रक्षण करण्यालाच सर्वाधिक प्राधान्य दिले पाहिजे. सीमेवर किंवा जम्मू काश्मीरसारख्या सतत दहशतवाद खदखदत असलेल्या भागामध्ये जवानांना आपल्या प्राणांची बाजी लावावी लागते. गेल्या चार वर्षात जम्मू काश्मीरमध्येच दहशतवाद आणि सीमेपलिकडच्या गोळीबारात भारतीय जवानांचे सर्वाधिक बळी गेले आहेत. अशावेळी अंदाजपत्रकात किंवा राज्यांच्या पातळीवर अनुदान वाढवणे किंवा त्यांच्या सहाय्य निधीमध्ये वाढ करणे हा उपाय ठरत नाही. हुतात्म्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत केली किंवा त्यांना हक्काप्रमाणे जमिनींचे वाटप केले की आपले कर्तव्य संपले. अशी जी बेजबाबदारपणाची भावना दिसून येते. ती आधी नाहीशी झाली पाहिजे. केंद्राने अंदाजपत्रकात संरक्षण विभागाची रक्कम वाढवली असतानाच तिकडे महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्र्यांनी पक्षाच्या एका कार्यकर्त्याने आयोजित केलेल्या एका खाजगी कार्यक्रमात हुतात्म्यांच्या कुटुंबियांना दिला जाणारा मदतनिधी दुप्पट केल्याचे जाहीर केले. खरे तर अशाप्रकारच्या खाजगी किंवा पक्षाच्या कार्यक्रमांमधून हुतात्म्यांच्या कुटुंबियांविषयी अशी शासकीय सहानुभूती दाखवणे अत्यंत चुकीचे ठरते. यासाठी विधीमंडळाचे व्यासपीठ उपलब्ध असते. सार्वभौम सभागृहामध्ये हुतात्म्यांच्या कुटुंबियांविषयी अशा प्रकारची सद्‌भावना व्यक्त होणे जास्त संयुक्तिक ठरले असते. परंतु त्याचाही राजकीय लाभ उठवण्याचा हा चुकीचा प्रकार केला गेला आहे. संबंधित कार्यक्रम हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी जरी आयोजित केला असला तरी तो पक्षकार्यकर्त्याने स्वयंसेवी संस्थेचे नाव पुढे करून केलेला कार्यक्रम होता. हे नाकारता येणार नाही.

## आधी मानसिकता बदला

शासकीय तिजोरीतून अशा प्रकारची मदत जाहीर करण्यात कोणताही मोठेपणा नाही. सरकार असो किंवा राजकीय कार्यकर्ते असोत. त्यांच्या मनात हुतात्म्यांच्या कुटुंबियांविषयी किती आदर आहे हे सर्वात महत्वाचे ठरते. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की महाराष्ट्राचेच उदाहरण घेतले तर आतापर्यंत किती हुतात्म्यांच्या कुटुंबियांची मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली. किती मंत्र्यांनी किंवा स्थानिक राजकीय कार्यकर्त्यांनी या कुटुंबियांचे घरी जाऊन सांत्वन केले. एवढेच कशाला पालकमंत्रीसुध्दा त्यांच्या सांत्वनासाठी घरापर्यंत जात नाहीत. खरे तर राज्यातील हुतात्मा जवानांच्या कुटुंबियांच्या घरी जाऊन त्यांचे सांत्वन करण्याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांची असली पाहिजे. परंतु राजकीय कार्यकर्त्यांना सतत महत्व देणाऱ्या सत्ताधाऱ्यांना या कुटुंबियांची आठवणही नसते. गेल्या चार वर्षातील महाराष्ट्रातली अशी अनेक उदाहरणे देता येतील. अनेक ठिकाणी लोक दबावामुळे आणि तेही उशिरा राजकीय नेते या कुटुंबियांच्या सांत्वनासाठी गेल्याचे प्रकार घडले. एवढेच नव्हे तर शासकीय स्तरावर घोषित झालेला मदतनिधी त्यांच्यापर्यंत पोहचायला जवळजवळ वर्षभराचा कालावधी निघून जातो. त्यांना देण्यात येणारी दोन हेक्टर जमीनसुध्दा तातडीने मिळू शकत नाही. म्हणजे राज्यकर्त्यांच्या मानसिकतेमध्ये मदत करण्याबद्दल उपकाराचीच भावना दिसून येते. एकाही हुतात्म्याच्या कुटुंबियांना त्याच्या घरी जाऊन सन्मानाने मदत दिली गेली आहे किंवा त्यांनी जी कागदपत्रे आदरपूर्वक सुपूर्द केली गेली आहेत असे कधीही होत नाही. म्हणूनच आधी मुख्यमंत्र्यांपासून मंत्री, पालकमंत्री किंवा स्थानिक राजकीय कार्यकर्त्यांनी हुतात्म्यांच्या कुटुंबियांची आस्थेवाईकपणे चौकशी केली पाहिजे. केवळ मदतनिधी दुप्पट करणे किंवा त्यांच्या सन्मानाचे कार्यक्रम केले म्हणजे त्यांच्याविषयी आदर व्यक्त झाला अशा समजूतीत त्यांनी राहू नये. सर्व प्रथम ही मानसिकता तयार करावी आणि त्यांच्या बलिदानाचा राजकीय वापर करण्याचे प्रकार ताबडतोब थांबवावेत.

## मग फुशारकी कशाला?

अथर्व फाऊंडेशनच्यावतीने वन फॉर ऑल, ऑल फॉर वन हा सैनिकांसाठी आयोजित केलेला कार्यक्रम वरळीत पार पडला. अथर्व फाऊंडेशनचे सुनिल राणे हे सत्ताधारी पक्षाचे पदाधिकारी पण आहेत. त्यांच्या या खाजगी कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी भाषण करताना सैनिकांच्या बलिदानाचे मोल पैशाने कधीच होऊ शकत नाही. पण त्यांच्या कुटुंबियांच्या सन्मानार्थ मदत दिली जाते. २०१४ मध्ये हुतात्म्यांच्या कुटुंबीयांना तीन लाख रुपये मदत दिली जात होती. ती आम्ही आठ लाख रुपये केली. मागच्या वर्षी याच कार्यक्रमात ही रक्कम पंचवीस लाख केल्याचा उल्लेखही त्यांनी केला आणि आता यापुढे ही रक्कम पन्नास लाख रुपये करण्याची घोषणा त्यांनी केली. याशिवाय अशोकचक्र, परमवीर चक्र अशा विविध पदकांसाठी दिल्या जाणाऱ्या मदतीची रक्कमही दुप्पट करण्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. हुतात्म्यांच्या बलिदानाचे पैशात मोल होऊ शकत नाही. हे जर मुख्यमंत्र्यांना ठावूक होते तर त्यांनी या अशा रकमेची घोषणा हुतात्म्यांच्या घरी जाऊन केली असती तर ती अधिक आदरार्थी ठरली असती. पैसे किंवा मदतनिधीमध्ये वाढ करण्याची कोणत्याही प्रकारची घोषणा ही अधिक गांभिर्याने आणि योग्य त्या शासकीय व्यासपीठांवरूनच करणे योग्य ठरते. पक्षीय किंवा खाजगी संस्थांच्या कार्यक्रमांमधून होणाऱ्या या घोषणांना नक्कीच राजकीय संदर्भ असतो हे आपोआप स्पष्ट होते.